दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
• वर्ष १६ वे • अंक ९९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.३ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना उच्च पदस्थ नोकरीसाठी अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्याची मागणी

बबनदादा पाटील व मा.आ.मनोहर भोईर यांनी घेतली सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.संजय मुखर्जी यांची भेट

दै.रायगड नगरी । पनवेल

नव्याने होवू घातलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या ठिकाणी प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या मुलांना उच्च पदावर नोकऱ्या देण्यासाठी तशा आशयाची अद्ययावत प्रशिक्षण केंद्रे उभारण्याची मागणी पनवेल उरण विधानसभेचे शिवसेनेचे मा.आ.मनोहर भोईर, शिवसेनेचे जिल्हा सल्लागार तथा स्व. दि.बा.पाटील स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ संजय मुखर्जी यांच्याकडे केली आहे. यावेळी त्यांच्यासोबत चंदू पाटील हे देखील उपस्थित होते.

विमानतळावर होत असलेल्या कामांसह याठिकाणी उच्च पदावरील होणाऱ्या नियुक्त्यामध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना सामावून घेण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये वैमानिक, टेक्निकल विभागातील अद्ययावत प्रशिक्षण त्यांना मिळावे आणि त्यांना या प्रकल्पामध्ये निर्माण होणाऱ्या रोजगारांमध्ये सामावून घ्यावे यासाठी पनवेल उरण परिसरातील महत्वाच्या ठिकाणी या मुलांसाठी अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्याची सुरुवात करण्याची प्रामुख्याने मागणी करण्यात आली आहे.

स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना प्राधान्याने नोकरी द्यावी, तसेच सदर ठिकाणी होत असलेल्या विमानतळावर विविध प्रकारच्या नोकऱ्या निर्माण होणार असून प्रकल्पग्रस्त तरुणांना त्यासाठी लागणारी कार्यकुशलता शिकता यावी म्हणून अद्ययावत प्रशिक्षण केंद्र येथे उभारण्याची खऱ्या अर्थाने गरज निर्माण झाली आहे. इथल्या स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध असणे ही प्रचंड गरज असून त्यांचा तो हक्क आहे, त्यासाठी सिडकोच्या माध्यमातून तातडीने प्रशिक्षण केंद्रे उपलब्ध होणे महत्वाचे आहे. इथला स्थानिक भूमिपुत्र कार्यकुशल झाल्यास तो इथे भविष्यात निर्माण होणाऱ्या विमानतळ प्रकल्पामध्ये निर्माण होत असलेल्या रोजगारांसाठी सक्षम होऊ शकतो, आणि त्यामुळे त्याच्या शैक्षणिक पात्रतेत येथील प्रकल्पामध्ये काम करण्याची योग्यता निर्माण होऊ शकते. म्हणून लवकरात लवकर अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्याची मागणी सिडकोकडे करण्यात आली आहे. या मागणीनुसार हे अद्ययावत प्रशिक्षण केंद्र सुरू झाल्यास येथील स्थानिक भूमिपुत्र तरुणांना त्याचा नक्कीच फायदा होईल, असे मत यावेळी बबनदादा पाटील यांनी व्यक्त केले.

रेवस-करंजा पूल दृष्टीपथात; ४० वर्षांनंतर पूर्ण होणार अलिबागकरांचे स्वप्न!

दै.रायगड नगरी । मुंबई

रायगडचे सुपूत्र स्व. बॅ.ए.आर. अंतुले यांचे स्वप्न असलेले रेवस-करंजा पूलाचे काम दृष्टीपथात आले आहे. या पूलासाठी निविदा प्रक्रिया ऑक्टोबरपर्यंत सुरु करण्याचे निर्देशही नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. या पूलासाठी सुमारे ८०० कोटी रुपये अंदाजित खर्च आहे. अलिबाग आणि उरणकरांसाठी या पुलाचे महत्व अनन्यसाधारण असून अलिबागचे आमदार महेंद्र दळवी हे आमदारकीच्या पहिल्या दिवसापासून याचा पाठपुरावा करत आहेत.

आज (२ जुलै) याबाबत मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीला एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी आणि नगरविकास आणि एमएसआरडीसीचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

कोकणात प्रस्तावित असलेल्या सागरी महामार्ग प्रकल्पात रेवस-करंजा याच्या दरम्यानचा हा पूल प्रस्तावित आहे. हा पूल चिर्लेपर्यंत येत असलेल्या सिडकोच्या रस्त्याला जोडला जाणार आहे. या पुलासाठी ८५० कोटी रुपयांचा निधी लागणार असून, प्रत्यक्ष काम सुरु करण्यासाठी सीआरझेड आणि वन विभागाची परवानगी आवश्यक आहे.

हे काम पूर्ण करण्यासाठी ९ हेक्टर जमिनीचे संपादनदेखील करावे लागणार आहे. मात्र या पुलाने या भागाला मोठा फायदा होणार आहे. तसेच शिवडी न्हावा-शेवा ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प आणि हा पूल पूर्ण झाल्यास अलिबाग आणि मुंबईतील अंतर कमी होणार असल्याने या पुलाचे काम लवकरच लवकर सुरु करण्याचे निर्देश ना.एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. येत्या चार महिन्यांत सर्व प्रकारच्या परवानग्या आणि भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून ऑक्टोबर महिन्यात या पुलाची निविदा प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश त्यांनी एमएसआरडीसीला दिले आहेत.

१९८२ पासून अलिबाग तालुक्यातील रेवस ते करंजादरम्यान पूल बांधण्याची मागणी करण्यात येत आहे. माजी मुख्यमंत्री स्व.ए.आर. अंतुले यांनीदेखील हा पूल बांधला जावा, यासाठी प्रयत्न केले होते.

हा पूल तयार झाल्यास तळकोकणात जाण्यासाठी एक पर्यायी मार्ग तयार होऊ शकेल, तसेच अलिबाग शहरातील नागरिकांना घ्यावा लागणारा ७० किलोमीटरचा वळसा वाचणार आहे.

त्यामुळे हा पूल लवकरात लवकर बांधला जावा, अशी मागणी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी आमदारकीच्या पहिल्या दिवसापासून लावून धरली होती. नगरविकास मंत्र्यांनी याबाबत एमएसआरडीसीला निर्देश दिल्याने आमदार दळवी यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

संक्षिप्त...

बारावीच्या निकालासाठी मूल्यमापन पद्धत जाहीर

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यातील बारावीच्या परीक्षेच्या निकालाचा फॉर्म्युला अखेर ठरलाय. बारावीच्या निकालासाठी दहावी, अकरावी आणि बारावीच्या अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ग्राह्य धरण्यात येणार आहे. सीबीएसई प्रमाणेचं हा फॉर्म्युला असणार आहे. दहावीसाठी ३० टक्के, अकरावीसाठी ३० टक्के आणि बारावीसाठी ४० टक्के या सूत्रानुसार विभागणी करण्यात आली आहे. सीबीएसई मंडळाप्रमाणे बारावीचा निकाल अंतर्गत मूल्यमापनाच्या ३०:३०:४० या सूत्रावर आधारित असणार आहे. यामध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेतील सर्वाधिक गुण मिळालेल्या ३ विषयांचे सरासरी गुण (३०%),अकरावीच्या वार्षिक मूल्यमापनातील विषयनिहाय गुण (३०%) व इयत्ता बारावीच्या अंतर्गत मूल्यमापनातील प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा ,सराव चाचण्या, तत्सम मूल्यमापन गुण (४०%) असे गुण एकत्र करून बारावीचे निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

निकाल तयार करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाकडून निकलासाठी मुख्याध्यापक /प्राचार्य यांच्यासह कमाल ७ सदस्य असलेली निकाल समिती स्थापन करण्यात येईल. शिवाय, दहावी प्रमाणे बारावी अंतर्गत मूल्यपामनद्वारे निकालासंबंधित सविस्तर वेळापत्रक मंडळाकडून लवकरच जाहीर करण्यात येईल. कोणत्याही प्रकारचे मूल्यमापन न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी (दिव्यांग विद्यार्थ्यांसहित) ऑनलाईन, दूरध्वनीद्वारे एकास एक वस्तुनिष्ठ पद्धतीने मूल्यमापन करून नोंदी करून गुण देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. शिवाय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार ३१ जुलै पर्यंत बारावीचा निकाल राज्य मंडळाकडून जाहीर करणे अपेक्षित आहे

प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९३२१५९२११३/ ८१०४४७७४०

पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते महापालिकेतील डॉक्टरांचा सत्कार

दै.रायगड नगरी । पनवेल

राष्ट्रीय डॉक्टरर्स दिनानिमित्त आज महापालिकेच्या डॉक्टरांचा आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कोरोना काळात अहोरात्र कार्यरत असणाऱ्या डॉक्टरांच्या कार्याबद्दल आयुक्त देशमुख यांनी गौरवोद्गार काढले. कोरानाची लढाई दिर्घ असून यापुढील काळातही डॉक्टर्स आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडतील असा विश्वास यावेळी आयुक्तांनी व्यक्त केला.

यावेळी महापालिकेचे मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व डॉक्टरर्सच्या वतीने डॉ. रेहाना मुजावर, डॉ. मनिषा चांडक, डॉ. पुनम जाधव, डॉ. अंजली मोहिते यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, पालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सर्वजण एकत्र आलो तर कोणत्याही संकटावर निश्चित मात करू : मुख्यमंत्री

दै.रायगड नगरी । मुंबई

कोरोनाच्या संकटावर मात करताना ऑक्सिजनबाबत आत्मनिर्भर होणे गरजेचे असल्याने मुंबईत विविध कंपन्यांच्या सीएसआर फंडातून पाच रुग्णालयांमध्ये उभारण्यात आलेल्या ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे लोकार्पण आज होत आहे. अशा पद्धतीने सर्वजण एकत्र आलो तर आपण कोणत्याही संकटावर निश्चित मात करू, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

मुंबईतील नेहरू सायन्स सेंटर, बांद्रा भाभा हॉस्पिटल, राजावाडी हॉस्पिटल, कूपर हॉस्पिटल आणि कस्तुरबा हॉस्पिटल येथे उभारण्यात आलेल्या ऑक्सिजन निर्मिती संयंत्रांचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री ठाकरे यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने झाले. यावेळी पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, महापालिका आयुक्त इकबालसिंह चहल, अतिरिक्त आयुक्त पी.वेलरासू आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, मुंबई आणि लाटांचा कायमचा संबंध आहे. एक लाट गेली की दुसऱ्याची तयारी करावी लागते. कोरोना काळातही सर्वांनीच युद्धजन्य परिस्थितीप्रमाणे काम केले. कोरोना काळात मुंबई मॉडेलचे जगभर कौतुक झाले. पण हे श्रेय माझे नसून प्रत्यक्ष काम करणाऱ्या आपल्या सर्वांचे आहे. वैद्यकीय प्राणवायू उत्पादन प्रकल्प उभारुन बृहन्मुंबई महानगरपालिकेची .../२

कोविड लसीकरण केंद्रास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांची भेट

दै.रायगड नगरी । अलिबाग

खालापूर तालुक्यातील ढेकू येथील गम्प्रो ड्रिल्लिंग फ्लुईड्स प्रा. लि. येथे आयोजित कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण केंद्र येथे आयोजित लसीकरण कार्यक्रमास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज (दि.२ जुलै) रोजी भेट दिली.

यावेळी पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख, रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, जि.प. सदस्या श्रीमती उमा मुंडे, नरेश पाटील, पद्मा पाटील, गम्प्रोचे व्यवस्थापकीय संचालक आनंद गुप्ता, जनरल मॅनेजर सुजित बोरसे, तहसिलदार इरेश चपलवार, ग्रामस्थ आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री म्हणाल्या की,करोनाला रोखण्यासाठी प्रतिबंधक लसीकरण करणे हे मुख्य शस्त्र असून नागरिकांनी लसीकरण करणे गरजेचे आहे. शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करणे, मास्क व सॅनिटायझर वापरणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनी नागरिकांमध्ये याबाबत जनजागृती करावी. त्याचबरोबर स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने गम्प्रो ड्रिल्लिंग फ्लुईड्स प्रा. लि. या कंपनीच्या व्यवस्थापन अतिशय शिस्तबध्द पध्दतीने नागरिकांसाठी लसीकरण मोहीम राबवित आहे, याबद्दल पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या कपंनीचे व्यवस्थापन व स्थानिक प्रशासन यांची प्रशंसा केली.

पशु वैद्यकीय डॉक्टरांचा संप; उपचारा विना पशुपक्षांचे हाल

दै.रायगड नगरी । उरण

ग्रामीण भागात काम करणाऱ्या पशु वैद्यकीय डॉक्टरांनी गेल्या पंधरा दिवसांपासून आपल्या विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. मात्र पशुसंवर्धन मंत्रालयाने त्यांच्या मागण्यांवर अजूनही विचार न केल्याने ते आपले आंदोलन अधिक तीव्र करणार आहेत. मात्र या संपामुळे पशुपक्षी पालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून आजारी पशु पक्षांना उपचार मिळत नसल्याने पशुपक्षाच्या मृत्यूचा आकडा वाढला आहे. परिणामी या संपाचा फटका ग्रामीण भागातील गरीब शेतकरी वर्गाला बसला आहे.

ग्रामीण भागात कोणाचेही पशुपक्षी आजारी पडले की शासकीय पशु वैद्यकीय डॉक्टर त्यांच्यावर लागलीच उपचार करून शेतकऱ्यांना मोठे सहकार्य करीत असतात. त्यामुळे पशुधनाचे संरक्षण होत असते. .../२

विधानसभेचा अध्यक्ष काँग्रेसचाच; आघाडीत मतभेद नाहीत : नाना पटोले

दै.रायगड नगरी । मुंबई

विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक याच अधिवेशानात व्हावी ही महाविकास आघाडीचीही इच्छा आहे. परंतु या मुद्द्यावरून भारतीय जनता पक्ष राज्यपालांच्या खांद्यावर बंदुक ठेवून राजकारण करत आहे त्याला आम्ही भिक घालत नाही. सध्याची कोरोनाची परिस्थिती पाहता आमदारांच्या कोविड चाचण्या झाल्यानंतरच परिस्थिती स्पष्ट होईल. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यपालांना पाठवलेल्या पत्रात जी भूमिका घेतली आहे ती योग्यच आहे त्यात चुकीचे काही नाही, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

टिळक भवन येथे नाना पटोले प्रसार माध्यमांशी बोलत होते. विधानसभेचा अध्यक्ष हा काँग्रेस पक्षाचाच होणार, त्यावर महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत. काँग्रेस पक्ष आपल्या आमदारांची मतं जाणून घेऊन पक्षश्रेष्ठींना कळवेल आणि अध्यक्षपदाचा उमेदवार जाहीर होईल. आघाडीतील तिन्ही पक्षांचा आपापल्या आमदारांवर पूर्ण विश्वास आहे त्यामुळे संख्याबळ कमी होईल म्हणून व्हिप काढला हा विरोधकांचा आरोप चुकीचा आहे. व्हीप काढणे ही एक व्यवस्था आहे, त्यात वावगे काही नाही, असे पटोले म्हणाले.

शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करता राज्याचा कृषी कायदा घाईघाईने बनवला जाऊ नये. राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करुन फुलप्रुफ कायदा व्हावा ही काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडी सरकारची भूमिका आहे. तीच भूमिका मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचीही आहे. केंद्र सरकारने आणलेल्या तीन काळ्या कृषी कायद्यांना आमचा विरोध आहे. केंद्राचे कृषी कायदे राज्यात लागू होणार नाहीत. राज्य सरकार आपला कायदा बनवेल. हा कायदा शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवूनच बनवला जाईल त्यासाठीचा मसुदा जनतेसमोर ठेवून शेतकऱ्यांची व जनतेची मतं मागवली जातील आणि त्यातून कायदा बनवला जाईल, असेही ते म्हणाले.

मराठा आरक्षण प्रश्नी केंद्र सरकारने दाखल केलेली पुनर्विचार याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळल्याने आरक्षण देण्याचा अधिकार केंद्र सरकारलाच आहे हे स्पष्ट झाले आहे. १०२ व्या घटनादुरुस्तीने राज्यांचे अधिकार केंद्रातील मोदी सरकारने काढून घेतलेले आहेत. त्यामुळे राज्याला आरक्षण देण्याचा .../२

महापुण्याची आव्हाने

हितसंबंधांचे राजकारण आणि अर्थकारण यांमुळे पुणे महापालिकेची गेली आठ वर्षे रखडलेली हद्दवाढ अखेर झाली आहे. लगतच्या २३ गावांचा पालिका हद्दीत समावेश झाल्याने, एकेकाळी 'पुनवडी', 'कसबे पुणे' या नावाने ओळखले जाणारे पुणे आता 'महापुणे' बनले आहे. क्षेत्रफळात पुणे पालिका ही राज्यातील सर्वांत मोठी पालिका ठरली आहे. पुढील वर्षीच्या पालिका निवडणुकांच्या तोंडावर राजकीय हेतूने ही हद्दवाढ झाली असली, तरी यामुळे पुण्याचे किंवा त्यात सामील होणाऱ्या गावांचे प्रश्न चुटकीसरशी सुटणारे नाहीत. उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी गावांच्या समावेशासाठी जशी आग्रही भूमिका घेतली, तशीच त्यांनी आता हद्दवाढीनंतरच्या नागरी सुविधांची आव्हाने पेलण्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या गावांच्या परिसरात पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, गटारे, कचरा व्यवस्थापन, रस्ते आणि वाहतूक अशा सुविधा पुरविण्यासाठी किमान नऊ हजार कोटी रुपयांची गरज आहे; त्याबरोबरच या वाढलेल्या पुण्याला पिण्यासाठी १९ अब्ज घनफूट (टीएमसी) पाण्याची आवश्यकता आहे. पुणे पालिकेच्या उत्पन्नाचे स्रोत आधीच आटले असून, मुख्य आव्हान सुविधांसाठी निधी उभारण्याचे आहे. वाढलेल्या हद्दीत विकासकामांसाठी ९० टक्के निधी राज्य सरकार देईल, असा निर्णय पूर्वीच्या आघाडी सरकारने घेतला होता. या निर्णयाच्या फायलीवरील धूळ झटकण्याची गरज असून, राज्याची तिजोरी खुली करण्याचा आग्रह अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे, 'करून दाखवले'ची घोषणा देणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी धरला पाहिजे. पुरेसा पैसा न आल्यास पुण्यावरील ताण वाढणार असून, विकासाच्या ऐवजी बकालपणा वाढण्याचा धोका आहे. पुण्यात समाविष्ट झालेल्या भागाचा विकास आराखडा पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) करण्यात येत आहे; परंतु तो सादर होण्यापूर्वीच हा भाग पालिकेत समाविष्ट झाल्याने उभा राहिलेला तांत्रिक पेचही सोडवावा लागेल. या आराखड्यातील 'विकासा'त परस्परविरोधी हितसंबंध आणि सर्वपक्षीय कारभाऱ्यांना पूर्वीपासून रस असल्याने त्यावरून होणारे वादही टाळावे लागतील. हद्दवाढीच्या निर्णयाला आधीच उशीर झाल्याने सुविधांच्या अभावी हैराण झालेल्या जनतेला दिलासा देण्यासाठी विकासाची गती वाढविण्याची गरज आहे. हद्दवाढीचा निर्णय करण्यात झालेली दिरंगाई आता परवडणारी नाही. शिक्षण, उद्योग, माहिती तंत्रज्ञान आदींमुळे विलक्षण वेगाने वाढलेल्या पुण्याबाबत व्यापक विकासाची योजना आखून कार्यवाही करण्याचा द्रष्टेपणा दुर्दैवाने दाखविला गेला नाही. हद्दवाढही टप्प्याटप्प्याने केली गेली. नव्वदच्या दशकात शिवसेना-भाजप युती सरकारच्या काळात ३८ गावांचा महापालिकेत समावेश झाला. मात्र, तेथील शेतकऱ्यांच्या जमिनींवर आरक्षणे लागू झाल्यावरून विरोध झाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही या समावेशास विरोध केला. पुढे काँग्रेससह सत्तेवर आल्यानंतर त्यातील २० गावे वगळली गेली. मात्र, एका तपानंतर सारे चित्र बदलले. २०१४ मध्ये मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या सरकारने ३४ गावांच्या महापालिकेत समावेशाची प्रक्रिया सुरू केली; परंतु अंतिम निर्णय घेण्यापूर्वी राज्यात सत्तांतर झाले. पूर्वी हद्दवाढीचे समर्थन करणाऱ्या भाजप-शिवसेनेचे सरकार आल्याने गावांचा समावेश होईल, अशी आशा होती. मात्र, 'राष्ट्रवादीचे प्राबल्य असलेल्या परिसराचा समावेश केल्यास पालिकेत सत्ता मिळविण्यात अडचणी येतील,' या भीतीपोटी हद्दवाढ लांबली. न्यायालयाने आदेश दिल्यानंतर ३४ पैकी फक्त ११ गावांचा समावेश केला. आता उर्वरित गावे हद्दीत आली असून, वर्तुळ पूर्ण झाले आहे. नियोजनबद्ध विकासाकडे धोरणकर्ते आता तरी लक्ष देतील का, हा प्रश्न आहे. पुण्याच्या हद्दवाढीच्या निमित्ताने राज्यातील शहरीकरणाचा आणि एकूणच शहर नियोजनाचा मुद्दा ऐरणीवर यायला हवा. शहरीकरणात महाराष्ट्र आघाडीवर असला, तरी भौगोलिक परिस्थिती आणि राजकारण्यांच्या ऱ्हस्व दृष्टीमुळे मुंबई, पुणे, औरंगाबाद व नाशिकपलीकडे औद्योगिक विकासाची फळे पोहोचलेली नाहीत. त्यामुळे मोजकी शहरेच विकासाची केंद्रे बनली. परिणामी तेथील लोकसंख्या वाढत गेली, जागांचे भाव गगनाला भिडल्याने घरे घेणे परवडेनासे झाले आणि त्यांच्या परिसरातील गावांमध्ये वस्ती वाढू लागली. या वाढत्या लोकवस्तीला पाणी, रस्ते, स्वच्छता आणि नियोजनबद्ध विकास अशा सुविधा देणे व मोठे विकासप्रकल्प उभारणे, हे उत्पन्नाची अपुरी साधने असलेल्या ग्रामपंचायतींच्या आवाक्याबाहेरचे ठरले आणि या गावांचाही श्वास घुसमटत गेला. नवी मुंबईतील सिडको, चंडीगड आणि पिंपरी-चिंचवड प्राधिकरण ही नियोजित विकासाची मॉडेल अपवाद असून, अन्यत्र आधी लोकवस्ती आणि त्यापाठोपाठ जमेल तशा नागरी सुविधा; अशी कधीही न संपणारी शर्यत सुरू आहे. या नागरिकांना शहराच्या तोडीच्या सुविधा देण्यासाठी गावांचा समावेश महापालिकेत करणे गरजेचेच आहे; परंतु राजकीय हिशेब घालत ते टाळण्याचाच प्रयत्न होताना दिसतो आहे. आपल्या शहरांचे बकालीकरण थांबवायचे असेल, तर त्यांच्या सर्वंकष विकासाचा मुद्दा सत्ताधाऱ्यांच्या अजेंड्यावर यायला हवा.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी खरीप पिक स्पर्धेत सहभाग घ्यावा : कैलास धुमाळ

दै.रायगड नगरी । पोलादपूर

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढवण्यासठी विविध भागामध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढकरण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देवुन विजेत्या शेतकऱ्यांचा गौरव केल्यास, त्यांचे मनोबल वाढण्यास मदत होवुन आधिक उमेदीने नवनविन अदयावत तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. रायगड जिल्ह्यामध्ये पीक वाढीसाठी प्रोत्साहन निर्माण होण्याच्या दृष्टीने भात, नाचणी (रागी), तुर इत्यादी पिकांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आली असून शेतकऱ्यांनी अधिकाधिक सहभाग घेण्याचे आवाहन पोलादपूर तालुका कृषी अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी कैलास धुमाळ यांनी केले आहे.

या पिकस्पर्धेच्या अटी व शताअमध्ये पीक स्पर्धेसाठी पीकनिहाय तालुका एक घटक आधारभुत धरण्यात येईल. खरीप हंगामासाठी स्पर्धेतील समाविष्ट पीके- भात, नाचणी (रागी), तुर इत्यादी पीके आहेत. प्रती तालुका किमानस्पर्धेक संख्या- सर्वसाधारण गटासाठी १० व आदिवासी गटासाठी ०५ पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीचे शेतावर त्या पिकाखाली किमान १० आर क्षेत्रावर सलग लागवड करणे आवश्यक आहे. पुरेसे अर्ज प्राप्त झालेवर संबधित पिकाची पिकस्पर्धा संबधित तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी जाहीर करतील. तालुक्यात पिक कापणी प्रयोग घ्यावयाची किमान संख्या- सर्वसाधारण गटासाठी ०५ व आदिवासी गटासाठी ०४ स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेंक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल.

सर्व गटासाठी पिक निहाय प्रत्येकी रक्कम तीनशे रुपये प्रवेश शुल्क असून अर्ज दाखल करण्याची तारीख- भात, नाचणी व तुर- ३१ ऑगस्ट २०२१ आहे. पिकस्पर्धेत भाग घेवू इच्छिणाऱ्या स्पर्धकांचे विहीत नमुन्यात अर्ज भरुन त्यासोबत ठरवून दिलेले प्रवेश शुल्क चलन, ७१२, ८अ चा उतारा व जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास) या कागद पत्राची पुर्तता करुन संबधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात द्यावेत, अशी माहिती देऊन स्पर्धेचे नियम व सविस्तर माहिती संकेतस्थळावर महाड उपविभागीय कृषी अधिकारी कैलास धुमाळ यांनी सांगितले.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी स्पर्धेतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची बक्षिसे तालुका पातळीवर ५हजार रूपये प्रथम, ३ हजार रूपये द्वितीय, २ हजार रूपये तृतीय, जिल्हा पातळीवर १०हजार रूपये प्रथम, ७०हजार रूपये द्वितीय, ५ हजार रूपये तृतीय, विभाग पातळीवर २५ हजार रूपये प्रथम, २० हजार रूपये द्वितीय, १५ हजार रूपये तृतीय, राज्य पातळीवर ५० हजार रूपये प्रथम, ४० हजार रूपये द्वितीय, ३०हजार रूपये तृतीय अशी असून रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांनी महाड, पोलादपुर, म्हसळा व श्रीवर्धन या तालुक्यातील आपआपल्या गावामध्ये काम करणारे कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक व तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा तसेच खरीप हंगाम २०२१ साठी देखील तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी भात, नाचणी व तुर या खरीप पिकासाठी ३१ ऑगस्ट २०२१ पुर्वी अर्ज सादर करुन पिकस्पर्धेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन महाड उपविभागाचे उपविभागीय कृषी अधिकारी कैलास धुमाळ यांनी महाड, पोलादपुर, म्हसळा व श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांना केले आहे.

पोलीस ठाण्यातील नेरळ पोलीस कुटुंबियांचे लसीकरण

दै.रायगड नगरी । कर्जत

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून नेरळ पोलीस ठाण्यातील कर्मचारी वर्गाच्या कुटुंबियांचे कोरोनाचा वाढता संसर्ग लक्षात घेऊन लसीकरण करण्यात आले.

राज्यात कोरोना या महामारीने थैमान घातले असून प्रशासन खबरदारी घेत होता. विनाकारण रस्त्यावर फिरू नये, यासाठी पोलिसांकडून संपूर्ण राज्यात बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी नेरळ पोलिसांकडून सुद्धा नेरळ शहरात कोरोनाचा प्रसार वाढू नये म्हणून शहराच्या ठिकठिकाणी बंदोबस्त ठेवला गेला. यावेळी पोलीस अधिकारीसह पोलीस कर्मचाऱ्यांना सुद्धा कोरोनाची लागण झाली होती.

रस्त्यावर उभे राहून कोरोना बाबत सुरक्षितता घेणारे पोलीस कर्मचारी यांनी आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी यासाठी नेरळ पोलिसांनी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने नेरळ पोलीस ठाणे येथे पोलिसांच्या कुटुंबाचे लसीकरण केले. यावेळी ५१ जणांनी कोव्हीशिल्ड या लसीचा पहिला डोस घेतलाय, या मध्ये पोलीस कर्मचाऱ्यांचे आई-वडील,पत्नी तर तरुण मुलांनी लसीकरण करून घेतले.

लसीकरणवेळी कर्जत तालुक्याचे उप विभागीय अधिकारी अनिल घेर्डीकर,नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संजय बांगर, तर पोलीस निरीक्षक भालचिम नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ सागर काटे, तसेच सुभाष चव्हाण सह अन्य नेरळ पोलीस ठाण्याचे कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

शिवसेनेच्या रणरागिणी जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी पिंजून काढत आहेत माथेरान मधील प्रभाग

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान नगरपरिषदेत शिवसेनेचे वर्चस्व कायमस्वरूपी प्रस्थापित करण्यासाठी आगामी नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक प्रभागात जाऊन तेथील महिला वर्गाला ज्या ज्या अडचणी, समस्या उद्भवत आहेत त्या जाणून घेण्यासाठी शिवसेनेच्या रणरागिणीनी माथेरान मधील प्रत्येक प्रभाग पिंजून काढण्यासाठी पक्षासाठी युद्धप-ातळीवर कामे सुरू केली आहेत.त्यांच्या या निस्वार्थी भूमिकेबद्दल शिवसेनेच्या विद्यमान नगराध्यक्षा तथा उत्तम प्रशासक प्रेरणा प्रसाद सावंत यांनी कौतुक केले आहे. नगरपरिषदेच्या निवडणुकीला जेमतेम पाच महिन्यांचा कालावधी उरलेला असताना पक्षाने गावात जी काही सकारात्मक आणि महत्वपूर्ण कामे मार्गी लावली आहेत. आणि अद्यापही अनेक ठिकाणी विकास कामे युद्धपातळीवर सुरू असून लवकरच पूर्णत्वास येणार आहेत. यातूनही काही शुल्लक लहान सहांन कामे प्रलंबित राहून जातात त्यामुळे नागरिकांमध्ये वेळप्रसंगी नाराजी व्यक्त केली जाते याकामी प्रत्येक प्रभागात जाऊन तेथील महिलांच्या व्यथा त्यांनी जाणून घेतल्या आहेत. प्रभाग क्रमांक दोन मधील सर्व महिलांना एकत्रित करून एक स्नेहभोजनाचा छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी विभाग प्रमुख निशा पार्टे आणि अनिता मोरे यांना याबाबत शहर संघटक संगीता जांभळे यांनी विचारले असता त्यांनी सांगितले की आमच्या प्रभागात उत्तम प्रकारे कामे पूर्ण करण्यात आली आहेत परंतु या भागातील पॉईंट कडे जाणाऱ्या रस्त्यावर ज्या ज्या ठिकाणी ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला आहे तो त्वरित दुरुस्ती करावा अन्य काही कामे अपुर्ण नसून ठराविक भागात पावसाळ्यात रस्ते खराब होतात त्याठिकाणी मातीचा भराव टाकावा. यावेळीप्रभाग क्रमांक दोन मधील एकूण सत्तरच्या आसपास महिला उपस्थित होत्या.

शहर संघटक संगीता जांभळे,यांच्या सोबत उप शहर संघटक समिना महापुळे, संपर्क संघटक प्रीती कळंबे, शलाका शेलार, श्रुतिका दाभेकर, अनिता मोरे, ऐश्वर्या शिंदे, हेमलता कदम, संजना शेलार, रचना सावंत, योगिता चौगुले, अंकिता मोरे, रिझवाना शेख, जुलेखा पटेल, दीपा परब, सुजाता शिंदे, निशा पार्टे, सविता शिंदे, कल्याणी शिंदे, जयश्री कदम, सविता कारंडे, सुहासिनी शिंदे आदी महिला मोठया प्रमाणावर उपस्थित होत्या.शिवसेनेच्या महिला आघाडी उत्तम प्रकारे पक्षाची कामे करून नागरिकांना भेडसावत असलेल्या समस्या जाणून घेण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करीत असल्याने नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी समाधान व्यक्त केले आहे.

डॉक्टर रुपी देवदूतांना वनौषधी रोपे व सन्मानपत्रे देवून गौरव

दै.रायगड नगरी । पनवेल

आर्या वनौषधींच्या या कार्यक्रमास एकता आवाज फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम येलवे, आर्या पाटील, पत्रकार दत्तू कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते कोरोना काळात रूग्णांसाठी देवदूत ठरलेल्या डॉक्टरांना केवडा, नीर ब्राम्ही, चिरायता, वेखंड आदी वनौषधी रोपे व सन्मानपत्रे देण्यात आली. कोरोना काळात डॉक्टरांना देवाचं रूप मानलं गेलं. अनेक रुग्णांसाठी तर डॉक्टर हा त्यांच्या आयुष्यात आलेला देवदूत वाटला. कोरोना काळात या देवदूतांनी आपला जीव धोक्यात घालून रुग्णांची सेवा केली. अशा या डॉक्टर रुपी देवदूतांच्या ऋणातून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता असे संस्थेचे अध्यक्ष व आर्या प्रहरचे संपादक सुधीर पाटील यांनी या वेळी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

सर्वजण एकत्र आलो तर कोणत्याही संकटावर निश्चित मात करू : मुख्यमंत्री

स्वयंपूर्णतेकडे होत असलेली वाटचाल ही अभिमानास्पद आहे, असे कौतुकाचे उद्गार त्यांनी काढले.

ऑक्सिजन अभावी मुंबईतील सुमारे १५० रूग्णांना दुसऱ्या रुग्णालयात उपचारासाठी हलवण्याचा निर्णय घेतल्याने मोठा अनर्थ टळला होता. त्या सुमारास राज्यात ऑक्सिजनची कमतरता भासत होती. त्यामुळे ऑक्सिजनबाबत आत्मनिर्भर होणे गरजेचे असल्याने आज नवीन पाच संयंत्रे सुरू झाली आहेत, याबद्दल मुख्यमंत्र्यांनी याबाबत पाठपुरावा करणारे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, संबंधित सर्व यंत्रणांसह सीएसआर निधीतून मदत केलेल्या कंपन्यांचेही आभार मानले. कोणत्याही कामाचे श्रेय घेण्याऐवजी आपले काम बोलले पाहिजे, असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. यावेळी आदित्य ठाकरे यांनी स्वतः कोविडग्रस्त असतानाची आठवण सांगितली. श्री. ठाकरे म्हणाले, ४ एप्रिल रोजी मुंबईत सुमारे ११ हजार रूग्ण होते, परंतु ऑक्सिजनच्या योग्य व्यवस्थापनामुळे सुदैवाने कोणीही दगावले नाही, याचे श्रेय महापालिकेची यंत्रणा आणि वैद्यकीय यंत्रणेला आहे. ऑक्सिजन बाबत आत्मनिर्भर होताना सीएसआर निधीतून मदत देण्याबाबत केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत तात्काळ पुढे येऊन मुंबईतील पाच आणि अन्य दोन अशा सात ठिकाणी ऑक्सिजन निर्मिती संयंत्र उभारल्याबद्दल श्री. ठाकरे यांनी कंपन्यांचे आभार मानले. ही मोलाची मदत असल्याचे त्यांनी सांगितले.

पशु वैद्यकीय डॉक्टरांचा संप; उपचारा विना पशुपक्षांचे हाल

मात्र शासकीय निर्णयानुसार ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या शासकीय सहाय्यक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पशुपक्षांवर उपचार करण्यास बंदी केली असून त्यांनी तालुका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार करण्याचे निर्देश दिल्याने ग्रामीण भागात पशु पक्षांना लागलीच उपचार मिळणे शक्य होत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील आजारी पशुपक्षांवर उपचार करण्यासाठी तालुका पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत पर्यंत अनेक पशुपक्षी मृत्युमुखी पडत आहेत.

ग्रामीण भागातील शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यातील डॉक्टरांनी आपले अधिकार अबाधित रहावेत म्हणून गेल्या पंधरा दिवसांपासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे.याचा संपूर्ण महाराष्ट्रात गोरगरीब पशुपालकांना जास्त फटका बसला असून उपचाराविना लाडके पशुधन मरणाच्या दारात जाताना शेतकऱ्यांना अनेक वेदना होत आहेत.त्यामुळे शासनाने पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या संपावर लवकर तोडगाकाढावा असे आवाहन अनेक शेतकऱ्यांनी केले आहे.

विधानसभेचा अध्यक्ष काँग्रेसचाच; आघाडीत मतभेद नाहीत : नाना पटोले

कोणताच अधिकार राहिलेला नसतानाही फडणवीस सरकारने आरक्षणचा कायदा केला तो सुप्रीम कोर्टात टिकू शकला नाही. सुप्रीम कोर्टाच्या या भूमिकेमुळे भारतीय जनता पक्षाचा खोटारडेपणा उघडा पडला असून त्यांच्याकडे आता सांगण्यासारखे काहीही नाही. आरक्षण संपुष्टात आणणे हा भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा डाव आहे. भाजपाने मराठा समाजाची तसेच विधानसभेचीही दिशाभूल केली आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा अधिकार राज्यांना नसल्याचे अधोरेखीत झाल्याने केंद्र सरकारने मराठा समाजाला न्याय द्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

विरोधी पक्षांमध्ये भीती निर्माण व्हावी यासाठीच ईडी, सीबीआय सारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर भाजपा करत आहे. त्यांच्या दहपशाहीला आम्ही भीत नाही. अमित शाह यांच्या मुलाची संपत्तीही भरमसाठ वाढली आहे त्याची चौकशी ईडी का करत नाही. जो भाजपात प्रवेश करतो त्याचे सर्व पाप धुतले जातात आणि जे विरोधी पक्षात आहेत त्यांच्यामागे चौकशीचा ससेमिरा लावला जातो, हे लोकशाहीसाठी घातक असल्याचेही पटोले म्हणाले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : बीड, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही श्री.राघो दुंदा पाटील व इतर १८ यांच्या सामाईक मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत आहे. सदरहू मिळकत ही श्री.राघो दुंदा पाटील व इतर १८ यांचेकडून आमचे अशिल श्री.जिया अब्दुल सत्तार नम्रे रा.तळोजा गाव, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे : बीड, ता.पनवेल, जि.रायगड

गट क्र.	उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार
५४	९	०-१९-०० पो.ख. ०-२४-०० एकूण ०-४३-००	०.२५

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, कुळ हक्क, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून एकवीस (२१) दिवसाच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा
दि.०३/०७/२०२१

सही/-
ॲड.सलमान रशिद पटेल
मु.पो.तळोजा पाचनंद, भारत राईस मिल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८
मो.नं.९२२२२२२७१६

ॲड.प्रतिभा देशमुख
अर्जदारातर्फे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौजदारी चौ.अर्ज नं.५१७/२०२१
ने.ता.२९/०७/२०२१

श्री.प्रतिक पद्माकर कडव
रा.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत पोयंजे — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची जन्माची नोंद ह्या दि.०६/०९/१९९१ रोजी मौजे : पोयंजे, जि.रायगड येथे जन्म झालेल्या असल्याने अर्जदाराने या न्यायालयात त्यांच्या जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयामध्ये अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार हे वर नमूद तारखेस व ठिकाणी जन्म झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून २९/०७/२०२१ आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.३०/०६/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

ॲड.वसीम धुरू पटेल
ॲड.वैशाली शिंदे

जाहीर नोटीस

IN THE COURT OF J.M.F.C PANVEL, AT PANVEL
Misc. Application No.220/2021
नि.नं.५/ड
ने.ता.२७/०७/२०२१

Mr.SAGEER SADIK PATEL
Age : 34 yrs, Occ-Auto Driver
Add-453 Nurani Masjid Bangiri Mohalla,
Taloja Pachnand Panvel Dist-Raigad — Applicant
V/S
Panvel Muncipal Corporation — Respondent

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील पै. MOHAMMAD SADIK GULAM SA PATEL दिनांक १७/०७/१९९४ रोजी मौजे : 453 Taloja ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू झाला असून त्यांच्या मृत्यूची नोंद पनवेल महानगरपालिका यांचे दप्तरी झाली नसल्याने त्यांचे मृत्यूच्या नोंदीकरिता अर्जदार प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब पनवेल यांच्या कोर्टात सदरचा चौकशी अर्ज दाखल केला असून, त्याच्या मृत्यू नोंदणीबाबत कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची लागलीच कारवाई करेल आणि ते जर अर्जदार यांचे वडील पै. MOHAMMAD SADIK GULAM SA. PATEL यांच्या मृत्यूचा दाखला घेण्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांच्या मृत्यूच्या नोंदणीचा मंजूर करेल याची दखल घ्यावी.

आज दि.१६/०६/२०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

बबन कांबळे यांची काँग्रेस सेवा फाऊंडेशनच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पदी निवड

दै.रायगड नगरी । उरण

उरण नगर परिषदेचे माजी नगरसेवक तथा आर्क फॉउंडेशनचे अध्यक्ष बबन कांबळे यांनी कोरोना काळात केलेल्या मानवतावादी कार्याची दखल घेत काँग्रेस पक्षाच्या काँग्रेस सेवा फॉउंडेशनच्या महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्ष पदी त्यांची निवड करण्यात आली आहे. तसे नियुक्ती पत्र काँग्रेस पक्षाच्या काँग्रेस सेवा फॉउंडेशनचे राष्ट्रीय इन्चार्ज अभिनव सिंग यांनी त्यांना दिले आहे.

बबन कांबळे हे आर्क फॉउंडेशनचे अध्यक्ष आहेत. या फॉउंडेशनच्या माध्यमातून कोविड काळात गोरगरीब जनतेला अन्नधान्य वाटप, ऍम्ब्युलन्स सेवा आदी उपक्रम आर्क फॉउंडेशनच्या माध्यमातून बबन कांबळे यांनी राबविले. यातूनच त्याचा संपर्क काँग्रेसच्या 'काँग्रेस सेवा फॉउंडेशन' या सेवाभावी संस्थेशी आला. अनेक कामे करताना काँग्रेस सेवा फॉउंडेशनची सुद्धा मदत बबन कांबळे यांना झाली. त्यातून बबन कांबळे यांचे संघटन कौशल्य, दांडगा जनसंपर्क व मानवतावादी कार्याचे कौतुक करत काँग्रेसने काँग्रेस सेवा फॉउंडेशनच्या महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्ष पदी त्यांची निवड केली आहे.सध्या बबन कांबळे हे रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे / कमिटीचे जिल्हा चिटणीस तसेच उरण शहर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आहेत.२०११-२०१६ दरम्यान उरण नगर परिषदेत नगरसेवक म्हणून त्यांनी काम केले. नगर परिषदेत विरोधी पक्षाची भूमिकाही सक्षमपणे त्यांनी पार पाडले. त्यांच्या या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत असून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

कोलघर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण

दै.रायगड नगरी । अलिबाग

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा कोलघर येथे आज कृषी दिनानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा कृषी अधिकारी बबन मनवे, गटविकास अधिकारी डॉ. दिप्ती देशमुख, सभापती पंचायत समिती प्रमोद ठाकूर, जिल्हा परिषद सदस्या श्रीमती चित्राताई पाटील, सरपंच श्रीमती रुपाली शिर्के, ग्रुप ग्रामपंचायत ताडवागळे उपसरपंच शैलेश पाटील, कोलघर आश्रमशाळेचे मुख्याध्यापक राजेन्द्र पाटील, शासकीय आश्रमशाळा अधीक्षिका माधुरी लोखंडे, चंद्रकांत काळे, मिलिंद पाटील, आर. एच.पाटील, सचिन जुईकर, प्रज्ञा मोरे, तिवरे, श्रीमती.म्हात्रे, शासकीय आश्रमशाळा कोलघर चे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, परिसरातील सर्व जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक, ग्रामपंचायत ताडवागळे ग्रामसेवक व सर्व सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

नाल्याच्या संरक्षण भितींचे काम नित्कृष्ठ दर्जाचे; नागरिकांनी केला संताप व्यक्त

दै.रायगड नगरी । पनवेल

गेली अनेक वर्षापासून असलेला कळंबोली सेक्टर ८ कारमेल शाळेला लागून असलेल्या नाल्याच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे करण्यात येत असून संरक्षण भिंत पावसाळ्यात तग धरेल का? असा सवाल नागरिक करत आहेत. तेव्हा या नाल्याची गुण नियंत्रकांकडून तपासणी करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

